# Criterion II

# KEY INDICATOR 2.1

# Metric No. 2.1.2

## 1. Reservation Policy

RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

Established by Government of Central Provinces Education Department by No. NotificationNo.513dated the1st of August1923 & presently a State University governed by M.P.U .Act 2016 (Mah. Act No. VI of 2017)

**INTERNAL QUALITY ASSURANCE CELL (IQAC)**

**Reaccreditation by NAAC 'A' Grade**

**Director, Dr. Sneha Deshpande** (M) 9822576404 email. iqacrtmnu@rediffmail.com


IQAC/ 91 Date: 19th March 2020

Translation

# GOVERNMENT OF MAHARASHTRA

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

----

PROCEDURE TO BE ADAPTED TO IMPLEMENT HORIZONTAL RESERVATION FOR DIRECT RECRUITMENT IN GOVERNMENT SERVICE

**Notification No.: SRV-1097/Pr.Kr.31/98/16-A**
**Mantralaya, Mumbai – 400032, Dated : 16 March, 1999**

References :

1) Govt. Resolution, G.A.D. No. SRV-1077/3576/1433/16-A, Dated 23-05-1978
2) Govt. Resolution, G.A.D. No. SEM-1080/35/16-A, Dated 21-01-1980
3) Govt. Notification, G.A.D. No. IPE/RTA-1080/O/181/16-A, Dated 10-10-1980
4) Govt. Resolution, G.A.D. No. SRV-1094/1004/Pr.Kr.30/16-A, Dated, 17-11-1994
5) Govt. Resolution, G.A.D. No. BCC-1094/Pr.Kr.-68/94/16-B, Dated, 12-08-1994
6) Govt. Resolution, M.V.V. No.-EQR-1094/Pr.Kr.768/Bhu.Pu.K-1, Dated 9-8-1995
7) Govt. Resolution, M.V.B.K.V.K.(Misc.)-1096/Pr.Kr.30/Ka-2, Dated 1-8-1997
8) Govt. Resolution, G.A.D. No. BCC-1097/Pr.Kr.2/97/16-B, Dated 6-8-1997
9) Govt. Notification, G.A.D. No. SRV-1097/Pr.Kr.12/97/16-A, Dated, 2-5-1998
10) Anilkumar Gupta V/s. State of Uttar Pradesh & Others [JT-1995(5) SC-505] – Directives given by the Hon. Supreme Court in this judgement.

Notification :

Government has implemented reservation policy for the recruitment of backward communities. It is vertical reservation as it is basically social reservation. In

addition, horizontal reservation has been introduced for some other communities besides backward communities. In this regard, Aurangabad bench of Hon. Bombay High court has ruled to give directions to implement horizontal reservation in the services in the WP No.4067/1998, referring the judgement of the Hon. Supreme Court in the case Anilkumar Gupta V/s. State of Uttar Pradesh & Others [JT-1995(5) SC-505]. In view of the above, all government services/semi-government services, boards/ corporations/ municipal councils/municipal corporations/zilla parishads/institutions receiving govt. grants/universities/ cooperative societies and govt. undertakings and others have been issued directions regarding modalities and guidelines to implement vertical and horizontal reservation in services.

2. Following is the vertical reservation for recruitment in services :-

| | |
|---|---|
| (1) Schedules Caste | : 13% |
| (2) Scheduled Tribes | : 7% |
| (3) Denotified Tribes (A) | : 3% |
| (4) Nomadic Tribes (B) | : 2.5% |
| (5) Nomadic Tribes (C) | : 3.5% |
| (6) Nomadic Tribes (D) | : 2% |
| (7) Special Backward Class | : 2% |
| (8) Other Backward Class | : 19% |

In addition to above reservation, following is the horizontal reservation applicable in recruitment in services : -

| | | |
|---|---|---|
| (1) Ex-servicemen | : 15% | - only for group C and D |
| (2) Project or Earthquake Affected People | : 5% | - only for group C and D |
| (3) Handicapped | : 3% | - for some posts under group A and group B and for group C and group D |
| (4) Women | : 30% | |

3. Horizontal reservation is applicable only for direct recruitment in services. Horizontal reservation is a part of social reservation and hence it should not be considered as reservation over & above social reservation.
4. As directed by the Hon Supreme Court in its judgement, horizontal reservation is compartmentalised reservation. Therefore before recruitment, while determining the posts and issuing advertisement, mere number of posts under social reservation should not be mentioned. Instead, under every social reservation (like; SC, ST, DT(A), NT(B), NT(C), NT(D), SBC, OBC and Open category), number of posts as per the special reservation should also be mentioned.
5. Following steps should be taken into consideration while determining percentage of horizontal reservation for respective categories for direct recruitment as directed by the Hon. Supreme Court in its judgement :

(a) **First Step** : A selection list of qualified candidates from open category be prepared. No question will be raised if this list contains sufficient number of candidates falling under horizontal reservation. If the number of candidates falling under horizontal reservation is not sufficient, candidates at the end of the selection list of open category should be deleted to accommodate candidates from the respective category deserving horizontal reservation.

(b) **Second Step** : Subsequently, selection list of every category under social reservation be prepared. (This list shall exclude those candidates who have already been accommodated as per step (a)).

(c) **Third Step** : In the list prepared as per (b) above, sufficient candidates falling under horizontal reservation for each category should be included as per the method prescribed in (a) above. But, this should be within the social category.

6. As per the judgement of the Hon. Supreme Court special reservation will be within the jurisdiction of vertical reservation. Therefore, special reservation cannot be transferred from one social reservation category to another social reservation category.
7. All the recruiting officers are directed to follow the above instruction without fail and as such it is ordered that these rules are applicable to all government services/semi-government services, boards/corporations/municipal councils/municipal corporations/zilla parishads/ institutions receiving govt. grants/universities/ cooperative societies and govt. undertakings and others.

By order and in the name of Governor of Maharashtra –

S/d
Under Secretary, Govt. of Maharashtra

**Translated By Dr. Mohan Kashikar,**
Professor and Head, Dept. of Political Science,
R.T.M. Nagpur University, Nagpur.

**Dr. Siddharthavinayaka P Kane**
Vice Chancellor,
R.T.M. Nagpur University, Nagpur.

**शासन सेवेत सरळसेवा भरतीसाठी समांतर आरक्षण (Horizontal Reservation) कार्यान्वित करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

परिपत्रक क्रमांक : एसआरव्ही- १०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक : १६ मार्च, १९९९

वाचा : १. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. एसआरव्ही-१०७७/३५७६/१४३३/१६-अ, दि. २३.५.१९७८.

२. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. एसईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २१.१.१९८०.

३. शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र. आयपीई/आरटीए-१०८०/०/१८१/१६-अ, दि. १०.१०.१९८०.

४. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. एसआरव्ही-१०९४/१००४/प्र.क्र.३०/१६-अ, दि. १७.११.१९९४.

५. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. बीसीसी-१०९४/प्र.क्र.-६८/९४/१६-ब, दि. १२.८.१९९४.

६. शासन निर्णय, म.व.वि.क्र.ईक्यूआर- १०९४/प्र.क्र.७६८/भूपुक-१, दि. ९.८.१९९५.

७. शासन निर्णय, म.व.बा.क.वि.क्र. संकीर्ण- १०९६/प्र.क्र.३०/का-२, दि. १.८.१९९७.

८. शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र. बीसीसी-१०९७/प्र.क्र. २/९७/१६-ब, दि. ६.८.१९९७.

९. शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र. एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.१२/९७/१६-अ, दि. २.५.१९९८.

१०. अनिलकुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी- १९९५(५) एससी-५०५) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्वे.

परिपत्रक : शासनाने सेवेतील भरतीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षण लागू केले आहे. हे आरक्षण सामाजिक आरक्षण (Social Reservation) असल्याने ते उभे आरक्षण (Vertical Reservation) आहे. त्याचप्रमाणे विशेष आरक्षण (Special Reservation) मागासवर्गीयांव्यतिरिक्त अन्य घटकांसाठी लागू केलेले आहे व ते समांतर किंवा आडवे आरक्षण (Horizontal Reservation) आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने (अॅपलेट साईड) रिटयाचिका क्रमांक : ४०६७/१९९८ वरील निर्णयान्वये अनिलकुमार गुप्ता वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर (जेटी-१९९५(५)एससी-५०५) या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयास अनुसरून समांतर आरक्षणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार सेवेतील उभे आरक्षण व समांतर आरक्षणाच्या संदर्भात अनुसरावयाची कार्यपद्धती व त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था/विद्यापीठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावे.

२. सेवेतील नियुक्तीसाठी सामाजिक (उभे आरक्षण) खालीलप्रमाणे आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | : | १३% |
| २. | अनुसूचित जमाती | : | ७% |
| ३. | विमुक्त जाती (अ) | : | ३% |
| ४. | भटक्या जमाती (ब) | : | २.५% |
| ५. | भटक्या जमाती (क) | : | ३.५% |
| ६. | भटक्या जमाती (ड) | : | २% |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | : | २% |
| ८. | इतर मागास वर्ग | : | १९% |

वर नमूद केलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त सेवेतील नियुक्त्यासाठी लागू असलेले विशेष आरक्षण (समांतर आरक्षण) पुढीलप्रमाणे आहे :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | माजी सैनिक | १५% | फक्त गट क आणि गट ड साठी |
| २. | प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त | ५% | फक्त गट क आणि गट ड साठी |
| ३. | अपंग | ३% | गट-अ आणि गट-ब मधील काही पदासाठी तसेच गट-क आणि गट-ड साठी |
| ४. | महिला | ३०% | |

३. समांतर आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीस लागू राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणन्यात येऊ नये.

४. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्याप्रमाणे समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण (Compartmentalised Reservation) आहे, म्हणून पदे भरण्यापूर्वी, पदे निश्चित करताना तसेच भरतीची जाहिरात देताना त्या जाहिरातीत केवळ सामाजिक आरक्षणाची पदसंख्याच नमूद न करता सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.ज.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि खुला प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार येणाऱ्या राखीव पदांची संख्या सुद्धा निर्देशित करावी.

५. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात/उल्लेखिलेल्यानुसार समांतर आरक्षणांतर्गत त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सरळसेवा भरती करताना खालील टप्पे विचारात घेण्यात यावेत :

**(अ) प्रथम टप्पा :** गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी, या यादीत, समांतर आरक्षणात बसणाऱ्यांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उदभवणार नाही आणि त्यानुसार पदे भरावीत. जर समांतर आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर समांतर आरक्षणाकरिता त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ट करावेत.

**(ब) दुसरा टप्पा :** त्यानंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड याद्या तयार कराव्यात (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा 'अ' मध्ये सामिल झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे.)

**(क) तिसरा टप्पा :** वरील 'ब' नुसार तयार करण्यात आलेल्या याद्यांमध्ये सामाजिक आरक्षणातील (Social Reservation) प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार 'अ' येथे विशद केलेल्या कार्यपद्धतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार सामाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत राहावे.

६. सर्वोच्च न्यायालयाच्या न्याय निर्णयात उल्लेखिलेल्यानुसार विशेष आरक्षण हे प्रत्येक उभ्या आरक्षणाच्या कक्षांतर्गत राहील. म्हणजेच विशेष आरक्षण हे एका सामाजिक आरक्षण प्रवर्गातून दुसऱ्या सामाजिक आरक्षण प्रवर्गात स्थानांतरीत करता येणार नाही.

७. सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी वरील कार्यपद्धती तसेच सूचनांनुसार यापुढे न चुकता कार्यवाही करावी हे आदेश शासकीय/निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगरपालिका/जिल्हापरिषदा/शासकीय अनुदान प्राप्त संस्था विद्यापीठे/सहकारी संस्था व शासकीय उपक्रम इत्यादींना लागू करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**भि. रा. वाढवे**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गांस तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी जागा आरक्षित ठेवण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २२/विशि-३**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ८ मार्च, २०१९.

**संदर्भ :-**

१) विधी व न्याय विभागाचा सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दि. ३० नोव्हेबर, २०१८.

२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गांच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या आणि पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतुद करण्यासाठीचा अधिनियम उपरोक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या दि. ३० नोव्हेंबर, २०१८ च्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील मुद्दा क्र. ४ (१) (क), अन्वये राज्यातील अनुदानित तसेच विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाच्या एकूण १६% जागा मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

तसेच संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ अन्वये शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाबाबतचे आवश्यक आदेश सर्व संबंधीत विभागांनी तात्काळ निर्गमित करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

सामान्य प्रशासन विभागाने उपरोक्त शासन निर्णयान्वये आदेशीत केल्यानुसार मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गांस १६% जागा तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% जागा महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता आरक्षित करण्याबाबत या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठांना निर्देश देण्याकरिता याबाबतचे शासन परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

८. सर्व स्वंय अर्थसहाय्यीत / अभिमत विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१३.उप सचिव, (विशि) (मशि) (तांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१४. उप सचिव (१६अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.निवड नस्ती - कार्यासन विशि-३.

४. राज्य शासनाच्या दिनांक ११-७-८७ च्या शासन निर्णयाप्रमाणे विद्यापीठ शैक्षणिक विभाग व संल महाविद्यालयातील अभ्यासक्रमात खालीलप्रमाणे आरक्षण निर्धारित करण्यात आले आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) अनुसूचित जाती | – | १३% | (२) अनुसूचित जमाती | – | ७ |
| (३) विमुक्त जाती (ए) | – | ३% | (४) भटक्या जमाती (बी) | – | २.५ |
| (५) भटक्या जमाती (सी) | – | ३.५% | (६) भटक्या जमाती (डी) | – | २ |
| (७) इतर मागासवर्गीय | – | १९% | | | |

असे एकूण ५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात.

वरील प्रवर्गातील ज्या मागासवर्गीय उमेदवारांची निवड गुणवत्तेनुसार ५० टक्के खुल्या जागांसाठी झाली असेल त्या गणना ५० टक्के खुल्या जागांतच केली जाते. त्यांची गणना राखीव जागांमध्ये केली जात नाही.

वरील मागासवर्गीय प्रवर्गातील एखाद्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास ह्या जागा आंतरबदल करून भरण्य येतात. आंतरबदलासाठी संबंधीत प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध नसल्यास सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारां सरमिसळ करून गुणवत्तेनुसार ह्या जागा भरण्यात येतात. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि उच्च व तंत्रशिक्ष विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वाला अनुसरून विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, संलग्नित संचालित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवड याद्या व प्रतिक्षा याद्या तय करण्यासंबंधी कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी सर्व शैक्षणिक विभागप्रमुख व प्राचार्यांना निर्गमि केलेले परिपत्रक क्र. एससीटी/एम/एस/२२४, दिनांक २८ जून, २००२ पुढीलप्रमाणे आहे.

## नागपूर विद्यापीठ

क्रमांक : एससीटी / एम / एस / २२४
दिनांक : २८ जून, २००२

**प्रति,**

१. विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभागप्रमुख
२. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य,
३. विद्यापीठ संचालित महाविद्यालय / संस्थेचे प्राचार्य / संचालक.

विषय : विद्यापीठ शैक्षणिक विभाग, संलग्नित व संचालित महाविद्यालयातील अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना द्यावयाच्य प्रवेशासंबंधीच्या निवड याद्या तयार करण्याची कार्यपद्धती.

**महोदय,**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वाला अनुसरून विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, संलग्नित व संचालित महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवड याद्या व प्रतिक्षा याद्या तयार करण्यासंबंधी खालील प्रमाणे कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे.

(१) सर्वप्रथम प्रवेशासाठी अर्ज केलेल्या सर्व पात्रताधारक विद्यार्थ्यांची (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसह) गुणवत्तेनुसार / गुणांकानुसार यादी तयार करावी. एकूण प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के विद्यार्थी संख्या ही खुल्या प्रवर्गातून प्रवेशासाठी पात्र ठरत असल्याने प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के विद्यार्थ्यांचा सर्वप्रथम निवड यादीत समावेश करावा. मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा वरील खुल्या प्रवर्गातील गुणवत्ता यादीत समावेश असल्यास त्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावा. त्यांचा समावेश मागासवर्गीय प्रवर्गासाठी तयार केलेल्या यादीत करण्यात येवू नये.

(२) वरील खुल्या प्रवर्गातील यादीत समाविष्ट असलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा नंतर खालोखाल गुणवत्ता / गुणांक प्राप्त केलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांची खालील टक्केवारीनुसार प्रवर्गनिहाय निवड यादी तयार करावी व त्याप्रमाणे प्रवेश द्यावा.

| | | | |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | | – | १३% |
| अनुसूचित जमाती | | – | ७% |
| विमुक्त जाती | (अ) | – | ३% |
| भटक्या जमाती | (ब) | – | २.५% |
| भटक्या जमाती | (क) | – | ३.५% |
| भटक्या जमाती | (ड) | – | २% |
| इतर मागासवर्गीय | | – | १९% |

(३) शासनाने व विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक / निर्णयानुसार अपंग, सैन्य दलात सक्रिय सेवेत असलेले (अॅक्टीव्ह सर्व्हिसेस) / कर्मचारी तसेच माजी सैनिक यांची पाल्ये व खेळाडू ह्या वर्गवारीत विद्यार्थ्यांना त्यांच्या विहित टक्केवारीनुसार त्यांच्या संबंधीत खुल्या किंवा मागासवर्गीय प्रवर्गातील राखीव जागांमधून आडवे (Horizontal) आरक्षण देण्यात यावे.

(४) गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहील्यास त्या जागांपैकी एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीतजास्त २ टक्केपर्यंत विशेष मागासवर्गीय (S. B. C.) उमेदवारांस गुणवत्तेनुसार प्रवेश देण्याची कार्यवाही घ्यावी.

(५) वरीलप्रमाणे २ टक्केपर्यंत विशेष मागासवर्गीय उमेदवारास प्रवेश देवूनही परिच्छेद २ मध्ये दर्शविलेल्या मागासवर्गीय प्रवर्गात त्यांना विहित केलेल्या टक्केवारीनुसार पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या मागासवर्गीयांना इतर प्रवर्गातून गुणवत्तेनुसार खालील गटाअंतर्गत आंतरबदल (Inter-Changability) तत्वानुसार भरण्यात याव्या.

गट १ : (i) अनुसूचित जाती (ii) अनुसूचित जमाती

गट २ : (i) विमुक्त जाती (अ) (ii) भटक्या जमाती (ब)

गट ३ : (i) भटक्या जमाती (क) (ii) भटक्या जमाती (ड) (iii) इतर मागासवर्गीय

(६) एकूण प्रवेश क्षमतेच्या ३० टक्के जागांवर महिलांना प्रवेश देणे आवश्यक असल्याने खुल्या व सर्व राखीव प्रवर्गात ३० टक्के जागांवर महिलांना प्रवेश मिळेल याबद्दल दक्षता घ्यावी.

(७) मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार शैक्षणिक सत्र २००२–२००३ पासून वरील कार्यपद्धतीचा अवलंब करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

आपला,
**सुभाष बेलसरे**
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ

प्रतिलीपी माहितीस्तव :

(१) सहायक कुलसचिव (सामान्य प्रशासन) नागपूर विद्यापीठ, नागपूर.
(२) सहायक कुलसचिव (महाविद्यालयीन शाखा).
(३) सहायक कुलसचिव (गडचिरोली उपकेंद्र) गडचिरोली.



POOJA MUKUND PATHAK
Digitally signed by POOJA MUKUND PATHAK
Date: 2023.12.16 13:22:25 +05'30'